**Government Of Maharashtra**
महाराष्ट्र शासन
**Office of the Joint Director of Industries (Mumbai Metropolitan Region)**
उद्योग सह संचालक (मुंबई प्राधिकरण विभाग) यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

दूरध्वनी क्रमांक २५२०६१९९/२५२०८१८२

Email:-didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- ०७.०९.२०२१.

**:- मुंबई शहर निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०३.०९.२०२१ चे इतिवृत्त -:**

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई शहरकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणींचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी मुंबई शहरकरिता जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०३.०९.२०२१ रोजी दुपारी ०४.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, समिती सभागृह, तळमजला मुंबई शहर जूने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई. ४००००१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम प्र. उद्योग सह संचालक (मुंप्रावि) यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई शहर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समितीअंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यात प्रचालन कृती आराखडाबाबत बदल अथवा सूचना तसेच निर्यातसंबंधी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
|---|---|---|
| १. | श्री. हरप्रित मकोल, | मुंबई शहर धारावी येथे लेदर वस्तु बनविण्याचे उद्योग मोठयाप्रमाणात आहेत. त्यामुळे सदर उद्योगांच्या निर्यातवाढीसाठी प्रयत्न |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यास उपस्थित प्रतिनिधी यांनी नमूद केले. |
| २. | श्री. रिशिकांत तिवारी, | लेदर उद्योग यांचे क्षमतावृध्दीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. |
| ३. | श्री. विजय कलंत्री, | लेदर प्रॉडक्स तसेच लेदर क्लस्टर्स तयार करून विस्तारित करण्याबाबत सूचित करण्यात आले. त्याशिवाय मुंबई जिल्हांतर्गत प्रदूषण करीत नसलेल्या व निर्यातक्षम उद्योगांसाठी विशेष प्रयत्न करण्याबाबत नमूद केले. निर्यातीबाबत अतिरिक्त सूचना सादर करण्यात येतील असे त्यांनी नमूद केले. |
| ४. | श्रीमती. सईदा पटेल | निर्यातीबाबत सविस्तर निवेदन सादर करण्याबाबत कळविण्यात आले. |
| ५. | श्रीमती. मृणालिनी इल्हे | जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कौंसिल यांचे देशभरात साधारण ६००० सदस्य असून त्यातील अंदाजे ८० टक्के हे सुक्ष्म लघु व मध्यम श्रेणीतील उद्योग आहेत. सदर सुक्ष्म लघु व मध्यम उद्योजक यांना त्यांची क्षमतावृध्दी, भांडवल, कच्चा माल आणि Logistic Support इत्यादी अडचणी भासतात. मुंबई मध्ये गिरगांव, लालबाग या ठिकाणी जेम्स अँड ज्वेलरी बाबतचे उद्योग स्थापित आहेत. निर्यातीबाबत अतिरिक्त सूचना सादर करण्यात येतील असे त्यांनी नमूद केले. |

३. पुढील बैठकीत Export Credit Guarantee Corporation of India यांचे प्रतिनिधीस बोलाविण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सह संचालक उद्योग (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

- <u>बैठकीस उपस्थित सदस्य</u> :-

| | | |
|---|---|---|
| १. | मा. राजीव निवतकर, | मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर |
| २. | श्रीमती. सुजाता उचित | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), |
| ३. | श्री. हरप्रित मकोल, | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), |
| ४. | श्री. रिशिकांत तिवारी, | लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, |
| ५. | श्री. विजय कलंत्री, | ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, |

| | | |
|---|---|---|
| ६. | श्री. सागर नागरे, | महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स असोसिएशन |
| ७. | श्री. करुणाकर शेटटी | महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स असोसिएशन |
| ८. | श्रीमती. सईदा पटेल | ॲपरल एक्सपोर्ट प्रमोशन कोन्सिल. |
| ९. | श्रीमती. मृणालिनी इल्हे | जेम्स ॲंड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, सदस्य, मुंबई. |
| १०. | श्री. मिथीलेश पांडे | जेम्स ॲंड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, सदस्य, मुंबई. |
| ११. | श्रीमती. वंदना प्रताप | सहयोगी उपाध्यक्ष आर्थिक विकास सल्लागार (Ernst & Young LLP) |
| १२. | श्रीमती. एम.एन.देवराज, | प्र. उद्योग सह संचालक (मुंप्रावि), मुंबई. |

जावक क्रमांक उससं/मुंप्रावि//मुंबई शहर/जिनिप्रस/बैठक/२०२१/३८५७ दिनांक :- 9 SEP 2021

प्रत :-

बैठकीस उपस्थित सदस्य, मुंबई शहर.